द ■मराठी दैनिक भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब
ग्लोबल टाइम्स
■ Register No. : RNI - MAHMAR /2012/44621 ■मुंबई ■अंक : ६३ ■वर्ष : १२
Web Site : www.theglobaltime.com ■ शुक्रवार दि. १५ मार्च २०२४ ■ पाने : ०८ ■ किंमत : ₹३.००

# डॉ. दीपक तुपे यांच्या संशोधन प्रोजेक्टला पाच लाखाचे अनुदान मंजूर

**कोल्हापूर** : येथील विवेकानंद कॉलेजच्या हिंदी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. दीपक रामा तुपे यांना भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली च्यावतीने 'अहिंदी भाषी क्षेत्र में हिंदी भाषा का विकास: समस्या एवं समाधान' विषयाच्या संशोधन प्रकल्पासाठी पाच लाख रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांनी डॉ. तुपे यांना सम्मानित केले आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी आणि सर्व प्राध्यापकांनी डॉ. तुपे यांचे अभिनंदन केले आहे.

डॉ. तुपे यांना १५ वर्षे अध्यापनाचा अनुभव आहे. तसेच १२ वर्षे संशोधनाचा अनुभव आहे. त्यांनी १० वर्षे पत्रकारिता देखील केली आहे. त्यांनी आजपर्यंत १५५ राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये शोध निबंधांचे वाचन केले आहे. त्यांचे ६३ संशोधन आलेख राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पत्रिकेत प्रकाशित झाले आहेत. यापूर्वी त्यांनी 'वर्तमान संदर्भ में हिंदी भाषा का रोजगारोन्मुख पक्ष' या विषयावर लघु शोध प्रकल्प पूर्ण केला आहे. तसेच त्यांचे हिंदी भाषा और सूचना प्रौद्योगिकी विषयावर पुस्तक प्रकाशित झाले आहे.

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ग्लोबल टाइम्स ■ मराठी दैनिक रविवार भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

■ Register No. : RNI - MAHMAR /2012/44621 ■ मुंबई ■ अंक : ६५ ■ वर्ष : १२

Web Site : www.theglobaltime.com ■ दि. १७ मार्च २०२४ ■ पाने : ०८ ■ किंमत : ₹ ३.००

# विवेकानंद कॉलेजमध्ये स्पंदन कलाप्रदर्शन उत्साहात

कोल्हापूर : येथील विवेकानंद कॉलेजच्या बी.व्होक. विभागामार्फत ग्राफिक डिझाईन, निमेशन एड फिल्म मेकींग, फोटोग्राफी व व्हिडीओग्राफी या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या वर्षभरातील कलाकृतींचे स्पंदन कलाप्रदर्शन २०२४ उत्साहात पार पडले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनाचे उद्घाटन पुणे येथील प्रसिध्द चित्रकार अमित चंद्रकांत ढाणे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी ते म्हणाले की, जाहिरात, फोटोग्राफी, निमेशन या क्षेत्रातील कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमाची उत्तम सोय विवेकानंद कॉलेजमध्ये असल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना या क्षेत्रात करिअर करण्याची चांगली संधी उपलब्ध झाली आहे, त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा. या क्षेत्रात यश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम, जिद्द, चिकाटी व सातत्यपूर्ण अभ्यास ठेवल्यास नावलौकिक व अर्थप्राप्तीही करता येते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे हे होते. याप्रसंगी बी.व्होक अभ्यासक्रमाच्या नोडल ऑफिसर डॉ. श्रुती जोशी, संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे उपस्थित होते.



## रेबीज रोगाविषयी जनजागृती...

**विवेकानंद कॉलेजच्या बी.व्होक ग्राफिक डिझाईन विभागाची माजी विद्यार्थिनी सृष्टी सुनिल शिंदे हिचे नुकतेच रेबीजने निधन झाले. तिच्या स्मृतिप्रित्यर्थ या प्रदर्शनामध्ये रेबीज या रोगाविषयीची जनजागृतीपर माहितीचे पोस्टर्स लावून तिला श्रध्दांजली वाहण्यात आली.**

कलाप्रदर्शनाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली बी.व्होक. विभागाने केले होते. प्रास्ताविक व स्वागत अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक व बी.व्होक विभागाच्या नोडल ऑफिसर डॉ. श्रुती जोशी यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. सतीश उपळावीकर यांनी करून दिली. या प्रदर्शनाचे समन्वयक प्रा. धीरज निंबाळकर यांनी आभार मानले. सुत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले.

प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे रजिस्ट्रार आर. बी. जोग, प्रा. राहुल इंगवले, प्रा. महेश माळी, प्रा. रविराज सुतार, प्रा. अभिजीत माने, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ग्लोबल टाइम्स

■ मराठी दैनिक

भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

■ Register No. : RNI - MAHMAR /2012/44621 ■ मुंबई ■ अंक : ७३ ■ वर्ष : १२

Web Site : www.theglobaltime.com ■ मंगळवार दि. २६ मार्च २०२४ ■ पाने : ०८ ■ किंमत : ₹ ३.००

# विवेकानंद कॉलेजमध्ये २७ व २८ मार्चला विवेकानंद महोत्सवाचे आयोजन

**कोल्हापूर** : येथील विवेकानंद कॉलेजमध्ये 'विवेकानंद महोत्स्व : शोध चैतन्याचा' हा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणारा उपक्रम दि. २७ व २८ मार्च रोजी होत आहे. हा उपक्रम विवेकानंद कॉलेजच्यावतीने दरवर्षी आयोजित केला जातो. हा महोत्सव राष्ट्रीय स्तरावरील असून यामध्ये विविध महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी विविध स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहेत.

महोत्सवाचे उद्घाटन दि. २७ रोजी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते सकाळी १० वाजता होणार आहे. यावेळी संस्था सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व विवेकानंद महोत्सवाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी उपस्थित राहणार आहेत.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी शॉर्टफिल्म्म मेकींग, एकपात्री, अभिवाचन, इनोव्हेटीव रिसर्च आयडीयाज अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेतील पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे १,००० रुपये, ७०० रुपये व ५०० रुपये रोख पारितोषिक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी कॉलेजमधील विद्यार्थी, विद्यार्थिनींसाठी मिस्टर विवेकानंद आणि मिस विवेकानंद या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन्ही दिवशी खवय्यांसाठी महाविद्यालयाच्यावतीने फुड फेस्टीवलचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी या महोत्सवाचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आणि विवेकानंद महोत्सवाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी केले आहे.

लोकमत
शनिवार ९.३.२०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये सैन्यभरती मार्गदर्शन मेळावा

## व्हाइट आर्मी, कोल्हापूर प्रेस क्लबचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : जीवन मुक्ती सेवा संस्थेच्या व्हाइट आर्मी आणि विवेकानंद महाविद्यालयातर्फे १२ मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत विवेकानंद कॉलेजच्या लायब्ररी हॉलमध्ये सैन्य भरती प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या तरुण आणि तरुणींसाठी मार्गदर्शन शिबिर आणि मेळावा घेण्यात येणार आहे, अशी माहिती व्हाइट आर्मीचे अशोक रोकडे आणि विवेकानंद कॉलेजचे एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

व्हाइट आर्मी, विवेकानंद महाविद्यालय आणि कोल्हापूर प्रेस क्लबमार्फत हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. कोल्हापुरातील टेंबलाईवाडी येथे कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि गोवा राज्याचे सैन्य भरती केंद्र आहे. याठिकाणी दरवर्षी हजारो तरुण सैन्य दलातील भरतीसाठी येत असतात. या केंद्राचे आर्मी रिक्रुटमेंट ऑफिसचे प्रमुख कर्नल आकाश मिश्रा आणि त्यांचे सर्व सहकारी या मेळाव्यात तिन्ही दलामध्ये वर्षभर चालणाऱ्या विविध भरती प्रक्रियेविषयी मार्गदर्शन करणार आहेत. याशिवाय अग्निवीरपासून एसएसबी, एनडीए, अधिकारी तसेच मेकॅनिकल इंजिनीअर, डॉक्टर या विभागातून देशसेवा करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या तरुण आणि तरुणींच्या प्रश्नांनाही ते उत्तरे देणार आहेत.

पत्रकार परिषदेला अशोक रोकडे, प्रा. संदीप पाटील यांच्यासह प्रशांत शेंडे, तनुजा लोखंडे, विराज केंगाळे, निशा तोरसकर, दयानंद आदमापुरे, सागरिका भोसले, सिध्दांत नागवेकर उपस्थित होते.

पुण्य नगरी

शनिवार, २ मार्च २०२४

# प्रा. संदीप पाटील यांना पुरस्कार

**कोल्हापूर :** जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्यातर्फे राज्याचे अप्पर मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, जिल्हा नोडल अधिकारी प्रा. संदीप पाटील यांना उत्कृष्ट संपर्क अधिकारी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. २०२३ मध्ये निवडणूक साक्षरता मंडळांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये मताधिकार, लोकशाही यासंबंधी केलेली जनजागृती, त्यासाठी राबविलेले नाविन्यपूर्ण उपक्रम, नवमतदार नोंदणी इत्यादी कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला. विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप पाटील यांनी निवडणूक साक्षरतेसंदर्भात विविध उपक्रम राबवले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत हा कार्यक्रम शिवाजी विद्यापीठात झाला. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे, पन्हाळा प्रांत अधिकारी समिर शिंगटे, उपजिल्हाधिकारी समाधान शेंडगे, शिवाजी विद्यापीठाचे प्र.कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आदी उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, आर. बी. जोग आदींनी प्रशासकीय कर्मचारी यांनी संदीप पाटील यांचे अभिनंदन केले.

पुण्य नगरी

गुरुवार, २८ मार्च २०२४

# 'विवेकानंद'चा आज विद्यार्थी गौरव समारंभ

**कोल्हापूर** : विवेकानंद महाविद्यालयाचा गुणी विद्यार्थी गौरव समारंभ गुरुवारी (दि. २८) सकाळी १० वाजता शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये होत आहे. यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध कथाकथनकार आप्पासाहेब खोत उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे असतील. सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तरी या समारंभास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राध्यापक प्रतिनिधी प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर, जिमखाना विभागप्रमुख प्रा. एन. आर. सणगर, रजिस्ट्रार आर. बी. जोग. प्रा. सहिदा कच्छी यांनी केले आहे.

२ पुण्य नगरी ▮ शुक्रवार, २९ मार्च २०२४

# मातीशी नाळ जोडून संस्कृती जपली पाहिजे : खोत

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी मातीशी नाळ जोडून आपली संस्कृती जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन कथाकथनकार आप्पासाहेब खोत यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजच्या गुणी विद्यार्थी गौरव समारंभात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. याप्रसंगी त्यांनी गवणेर या कथेचे सादरीकरण केले. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

यावेळी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळवलेल्या कला, क्रीडा, सांस्कृतिक, एन.सी.सी. व एन.एस.एस. विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. परीक्षा नियंत्रक डॉ. जी. जे. नवाथे, डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. एस. एस. कुंडले यांनी पारितोषिकांचे वाचन केले. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले. आभार प्रा. सहिदा कच्छी यांनी मानले. आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, गणित विभागप्रमुख प्रा. संजय थोरात, जिमखाना विभागप्रमुख प्रा. एन. आर. सणगर, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आरिफ महात, कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जे. आर. भरमगोडा, प्रा. समीर पठाण, रजिस्ट्रार आर. बी. जोग आदी उपस्थित होते.



विवेकानंद कॉलेजच्या समारंभात बोलताना आप्पासाहेब खोत. सोबत अन्य मान्यवर.

30/03/24

30.3.24

पुढारी

शुक्रवार, १ मार्च २०२४

## मराठी भाषा संवर्धन काळाची गरज : प्राचार्य साळुंखे

**कोल्हापूर :** मातृभाषा मराठी टिकली तरच सुसंस्कारी समाज टिकेल. त्यामुळे मराठी भाषा संवर्धन काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले. मराठी राजभाषा गौरव दिनाच्या निमित्ताने मराठी विभागातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य साळुंखे यांचा सत्कार माजी नगरसेवक अजित ठाणेकर यांच्या हस्ते करण्यात आला. डॉ. धीरज शिंदे यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय मनोगत डॉ. गुरुदत्त म्हाडगुत यांनी व्यक्त केले. संतोष परब यांनी आभार मानले. यावेळी हितेंद्र साळुंखे, संदीप जाधव आदी उपस्थित होते.

01/03/24

1-3-24

पुढारी

शनिवार, २ मार्च २०२४

# 'विवेकानंद'मध्ये भित्तीपत्रक प्रदर्शन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेजमध्ये प्राणीशास्त्र विभागामार्फत इम्युनोलॉजीकल टेक्नीक्स या विषयावर राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भित्तीपत्रक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. डॉ. एस. एस. कुंभार व एस. एच. नदाफ यांनी भित्तीपत्रकांचे परीक्षण केले. विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयक वेगवेगळी आकर्षक आणि माहितीपूरक अशी माहितीपत्रके बनविली होती. प्रदर्शनातून विद्यार्थ्यांमध्ये विविध रोगनिदान तंत्राबद्दल जागरुकता निर्माण झाली. कार्यक्रमासाठी विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, ५ मार्च २०२४

# विद्यार्थ्यांनी लोकशाही समजून घेतली पाहिजे : कॉ. गिरीश फोंडे

**कोल्हापूर :** बिकट सामाजिक परिस्थितीतून नेतृत्वाची जडणघडण होते. नेतृत्व, कौशल्य, तत्त्वे एकमेकांपासून वेगळी करता येत नाहीत. विद्यार्थ्यांनी लोकशाही समजून घेतली पाहिजे. जागतिक व स्थानिक अशा दोन्ही पातळ्यांवर विचारशील, कृतिशील राहिले पाहिजे, असे मत कॉ. गिरीश फोंडे यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेजमध्ये राज्यशास्त्र विभागातर्फे शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय (न्यू कॉलेज, क्लस्टर) अंतर्गत प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी 'राज्यशास्त्र विषयातील कौशल्ये' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख डॉ. ई. बी. आळवेकर होते. फोंडे यांनी युवक व नेतृत्व विकास विषयावर मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे आयोजन प्राचार्य डॉ.आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. समीक्षा फराकटे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.अभिषेक चौगुले यांनी आभार मानले.

05/03/24

पुढारी MY कोल्हापूर रविवार, ३ मार्च २०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये विज्ञान दिन विविध उपक्रमांनी साजरा

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये रसायनशास्त्र विभागाच्या वतीने विज्ञान दिन विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. विविध शास्त्रज्ञांविषयी माहितीपर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली आली.

डॉ. सी. व्ही. रमण यांच्या जीवनावरील लघुपट दाखविण्यात आला. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, डॉ. मेरी क्युरी, डॉ. स्वामीनाथन, डॉ. रॉबर्ट ओपनहायमर या शास्त्रज्ञांचा जीवनपट, त्यांचे कार्य शोध याचा आढावा घेण्यात आला. संयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विभागप्रमुख डॉ. एस. डी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ए. एस. तपासे यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी MY कोल्हापूर रविवार, ३ मार्च २०२४

# 'विवेकानंद'च्या रिया पाटीलचे मैदानी स्पर्धेत यश

**कोल्हापूर :** गुवाहाटी (आसाम) येथे झालेल्या खेलो इंडिया शिवाजी विद्यापीठ मैदानी क्रीडा स्पर्धेतील ४ X १०० मीटर मिक्स रिले स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेजच्या रिया पाटील हिने रजतपदक पटकावले. राष्ट्रीय ज्युनिअर मैदानी क्रीडा स्पर्धेत ४ X ४०० मीटर मिक्स रिले स्पर्धेमध्ये सुद्धा रिया पाटीलने सुवर्णपदक पटकावले. तामिळनाडू येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत मिक्स रिलेमध्ये सुवर्णपदक पटकाविले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. ज्यु. जिमखाना विभागप्रमुख प्रा. सहिदा कच्छी, प्रा. हवलदार एन. आर. सणगर, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, २३ मार्च २०२४

# 'विवेकानंद'चा २८ रोजी विद्यार्थी गुणगौरव समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी गुणगौरव समारंभ गुरुवार, दि.२८ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. डॉ.बापूजी साळुंखे भवन येथे होणाऱ्या कार्यक्रमात कथाकथनकार आप्पासाहेब खोत यांच्या हस्ते विविध क्षेत्रांत प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला जाणार आहे.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे अध्यक्षस्थानी असतील. संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले आहे.

23/03/24

23.3.24

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २७ मार्च २०२४

# 'विवेकानंद'मध्ये आजपासून विवेकानंद महोत्सव

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये 'विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा' हा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणारा उपक्रम २७ व २८ मार्च दरम्यान होणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील महोत्सवात विविध महाविद्यालयांतील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. महोत्सवाचे उद्घाटन दि. २७ रोजी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते सकाळी १० वाजता होणार आहे. यावेळी संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, महोत्सव समन्वयक डॉ. श्रुती जोशी उपस्थित राहणार आहेत. महोत्सवात पहिल्या दिवशी शॉर्ट फिल्म मेकींग, एकपात्री, अभिवाचन, इनोव्हेटीव रिसर्च आयडीयाज अशा विविध स्पर्धा होतील.

27/03/24

27.3.24

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, ३० मार्च २०२४



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार. समवेत डॉ. श्रुती जोशी, डॉ. प्रदीप पाटील आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे गरजेचे : प्राचार्य डॉ. कुंभार

**कोल्हापूर :** सध्याचा काळ कौशल्य विकासाचा असून, अशा काळात विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी स्पर्धेमध्ये सहभागी होणे महत्त्वाचे आहे. स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित 'विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा' महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. फूड फेस्टिव्हलचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी अभिवाचन, नावीन्यपूर्ण संशोधन, शॉर्ट फिल्म मेकिंग, एकपात्री स्पर्धा झाल्या. मिस्टर अँड मिस विवेकानंद ही स्पर्धा महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी झाली. स्पर्धेत मुंबई, पुणे, सांगली, सातारा येथील संघ सहभागी झाले. समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी महोत्सवाचा उद्देश प्रास्ताविकात सांगितला. समन्वयक म्हणून डॉ. प्रदीप पाटील, प्रा. एच. व्ही. चामे, प्रा. डॉ. ए. एस. महात, प्रा. पल्लवी देसाई, प्रा. सनी काळे यांनी जबाबदारी पार पाडली. प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी आभार मानले.

# विवेकानंदला उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार

**कोल्हापूर :** राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या हस्ते विवेकानंद महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. शिवाजी विद्यापीठात झालेल्या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय शिंदे, पन्हाळा प्रांत अधिकारी समीर शिंगटे, उपजिल्हाधिकारी समाधान शेंडगे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. जिल्हा नोडल अधिकारी म्हणून विवेकानंद कॉलेजचे रा. से. योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील यांना उत्कृष्ट संपर्क अधिकारी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी राज्यशास्त्र विभागप्रमुख समीक्षा फराकटे उपस्थित होत्या. यशाबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले.

यांना अभिनंदन केले.

पुढारी

कोल्हापूर, बुधवार, ६ मार्च २०२४

# रोटरॅक्ट क्लब ऑफ विवेकानंद कॉलेजचा पहिला पदग्रहण सोहळा

**कोल्हापूर :** रोटरी इंटरनॅशनल अंतर्गत, रोटरॅक्ट क्लब ऑफ विवेकानंद कॉलेजचा पहिला पदग्रहण सोहळा उत्साहात झाला. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१७० गव्हर्नर नासिर बोरसदवाला, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी मार्गदर्शन केले. कोल्हापूर झोन हेड अभिजित पाटील यांनी रोटरॅक्टमधून परदेशातील शिक्षणाच्या संधी याबद्दल मार्गदर्शन केले. नूतन अध्यक्षपदी रोहित पाटील, सचिवपदी वैष्णवी राजपूत , खजानीसपदी प्रवीण जामखंडी व संचालकपदी सर्व विभागांतील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यावेळी रोटेरियन दादासाहेब कोडोलकर, मानसिंग पानसकर, वारणा वडगावकर, उदय दीक्षित उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर सोमवार, ११ मार्च २०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये आजपासून स्पंदन कलाप्रदर्शन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेजच्या बी.व्होक. विभागामार्फत ग्राफिक डिझाईन, ॲनिमेशन ॲण्ड फिल्म मेकींग व फोटोग्राफी व व्हिडीओग्राफी पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या वर्षभरातील कलाकृतींचे कलाप्रदर्शन ११ ते १३ मार्च या कालावधीत शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनमध्ये आयोजित केले आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन पुणे येथील प्रसिध्द चित्रकार अमित ढाणे यांच्या सोमवारी सकाळी १० वाजता होणार आहे. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे असणार आहेत. प्रदर्शनाचे समन्वयक म्हणून प्रा.धीरज निंबाळकर म्हणून काम पाहत आहेत.

दरम्यान, विवेकानंद कॉलेजच्या बी.व्होक ग्राफिक डिझाईन विभागाची माजी विद्यार्थिनी सृष्टी शिंदे हिचे नुकतेच रेबीजने निधन झाले. तिच्या स्मृतिप्रित्यर्थ प्रदर्शनामध्ये रेबीज विषयी जनजागृतीपर माहितीचे पोस्टर्स लावली जाणार आहेत.

दै. पुढारी 11/03/2024

# डॉ. दीपक तुपे यांच्या संशोधन प्रकल्पास पाच लाख अनुदान मंजूर

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज हिंदी विभागातील सहायक प्रा. डॉ. दीपक तुपे यांना भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्लीच्या वतीने 'अहिंदी भाषी क्षेत्र में हिंदी भाषा का विकासः समस्या एवं समाधान' विषयाच्या संशोधन प्रकल्पासाठी पाच लाख रुपयांचे अनुदान मंजूर झाले. त्यांना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांनी सम्मानित केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौतुभ गावडे, डॉ. श्रुती जोशी यांनी डॉ. तुपे यांचे अभिनंदन केले. डॉ. तुपे यांना १५ वर्षे अध्यापनाचा तसेच १२ वर्षे संशोधनाचा अनुभव आहे. त्यांनी १० वर्षे पत्रकारिता केली आहे. १५५ चर्चासत्रांमध्ये शोध निबंधांचे वाचन केले आहे. त्यांचे ६३ संशोधन लेख पत्रिकेत प्रकाशित झाले आहेत.

पुढारी
बुधवार, १३ मार्च २०२४



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात आयोजित 'स्पंदन' कला प्रदर्शनाची पाहणी करताना प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सीईओ कौस्तुभ गावडे.

# जाहिरात, ॲनिमेशन, फोटोग्राफी क्षेत्रात रोजगाराच्या संधी : अमित ढाणे

**कोल्हापूर :** जाहिरात, ॲनिमेशन व फोटोग्राफी क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, असे प्रतिपादन पुणे येथील चित्रकार अमित ढाणे यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या बी.व्होक. विभागामार्फत ग्राफिक डिझाईन, अनिमेशन अण्ड फिल्म मेकिंग व फोटोग्राफी व व्हिडीओग्राफी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या वर्षभरातील कलाकृतींचे 'स्पंदन कलाप्रदर्शन' उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे होते. संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांनी मनोगत व्यक्त केले. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक व बी.व्होक. विभागाच्या नोडल ऑफिसर डॉ. श्रुती जोशी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सतीश उपळावीकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. समन्वयक प्रा. धीरज निंबाळकर यांनी आभार मानले.

09/03/2024

सकाळ

कोल्हापूर, शनिवार, ९ मार्च, २०२४

# लष्कर भरती प्रकियेबाबत मंगळवारी मार्गदर्शन शिबिर

## व्हाईट आर्मी, विवेकानंद कॉलेजतर्फे आयोजन

कोल्हापूर, ता. ८ : व्हाईट आर्मी व विवेकानंद कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने भारतीय लष्कराच्या तिन्ही दलात वर्षभर भरती प्रक्रीया कशी होते?.यावर मंगळवारी (दि.१२) विवेकानंद कॉलेजच्या ग्रंथालय सभागृहात सकाळी १० वाजता विशेष मार्गदर्शन शिबिर होणार आहे. आर्मी रिक्रुटमेंटचे अधिकारी कर्नल आकाश मिश्रा मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती आज अशोक रोकडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कोल्हापूरातील टेंबलाईवाडी लष्करी भरती केंद्रात कोल्हापूरसह सातारा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, येथील युवक-युवती भरती होतात. यात अग्निवीर, एसएसबी एनडीए, ऑफीसर लेवल, मेकॅनिकल , अभियंता, डॉक्टर अशा अनेक विभागांत मुले-मुलींना लष्कराच्या तिन्ही दलात वर्षभर भरतीप्रक्रिया होते. भरतीत अनेक उमेदवारांना कागदपत्रे, प्रक्रियेबद्दल माहिती नसते. शंकांचे निरसन न झाल्याने मेहनत घेवूनही माघारी फिरावे लागते. यासंदर्भात मिश्रा मार्गदर्शन करतील. युवक युवतींना सैन्यभरतीच्या संधी देण्यात विवेकानंद महाविद्यालयाचा हातभार लागला आहे. शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनीही केले. प्रा. संदीप पाटील उपस्थित होते.

सकाळ

कोल्हापूर, रविवार, १७ मार्च, २०२४

# सैन्यदलात जाऊन करिअर घडवा

## कर्नल आकाश मिश्रा; व्हाईट आर्मी, विवेकानंद कॉलेजतर्फे व्याख्यान




**कोल्हापूर** : व्हाईट आर्मी आणि विवेकानंद कॉलेजतर्फे आयोजित व्याख्यानात मंगळवारी आर्मी रिक्रुटमेंट कमांडिंग ऑफिसर कर्नल आकाश मिश्रा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी अशोक रोकडे, एकनाथ आळवेकर, संदीप पाटील उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. १६ : सैन्यभरती प्रक्रिया खूप पारदर्शक असते. त्याबाबत आमिषाला बळी पडू नका. सैन्यदलात भरती होऊन करिअर घडवा, असे आवाहन आर्मी रिक्रुटमेंट कमांडिंग ऑफिसर कर्नल आकाश मिश्रा यांनी विद्यार्थ्यांना येथे केले.

येथील व्हाईट आर्मी आणि विवेकानंद कॉलेजतर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अग्निवीर एसएसबी आणि एनडीए ऑफिसरबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. एआरओचे सुभेदार मेजर बलिहार सिंग यांच्यासह जवानांनी माहिती दिली. अध्यक्षस्थानी कॉलेजचे मराठी विभागप्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर होते.

कर्नल आकाश मिश्रा म्हणाले, 'सैन्यभरतीत अग्निवीरपासून अधिकारी बनण्यासाठी महिलांना वेगवेगळे मार्ग देशाने निर्माण केले आहेत. ही संधी सोपी आहे. त्यात टेक्निकल ते मेडिकलपर्यंत सर्व सुविधा महिलांना उपलब्ध आहेत. सैन्यात सहभागी होऊन पुढील शिक्षणही घेऊ शकता. त्यासाठी सवलतही आहे. खेळाडू असाल तर सैन्यात विशेष खेळाडू म्हणून करिअर करता येते. टेक्निकल मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक डिप्लोमा आणि आयटीआय असणाऱ्यांनाही सैन्यात चांगली संधी आहे.

कार्यक्रमात व्हाईट आर्मीचे संस्थापक अध्यक्ष अशोक रोकडे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी देशात होणाऱ्या सैन्य भरतीचे प्रत्येक महिन्याचे माहिती संकलन आणि प्रसिद्धी केंद्र सुरू करण्याचे काम व्हाईट आर्मीतर्फे सुरू आहे. सैन्य भरतीत येणाऱ्या अडचणीबाबत मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात येईल. कोल्हापुरातील तरुणांना देश सेवेसाठी अधिकारी बनण्यासाठी लागणाऱ्या सुविधा पुरविण्याची व्यवस्था येथे होणार असल्याचे त्यांनी सांगितले. एनसीसी लेफ्टनंट प्रा. जे. आर. भरमगोंडा यांनी सूत्रसंचालन केले. 'एनएसएस'चे कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील यांनी आभार मानले. प्रा. सुनीता भोसले, प्रशांत शेंडे आदींनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

सकाळ

कोल्हापूर, रविवार, १७ मार्च, २०२४

18/03/24

18/3/24



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये मानसिक आरोग्य चर्चासत्र झाले.

# विवेकानंद कॉलेजमध्ये मानसिक आरोग्यावर चर्चासत्र

कोल्हापूर, ता. १६ : रोटरी मेंटल हेल्थ उपक्रम व रोटरॅक्ट मुव्हमेंट कोल्हापूर झोनतर्फे विवेकानंद कॉलेज मध्ये मानसिक आरोग्य सेवा चर्चासत्र व रक्तदान शिबिर झाले. तणावग्रस्त विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या परीक्षा व व्यावसायिकांसाठी सकारात्मक विचारांचा प्रसार करणे या हेतूने या शोबिराचेआयोजन केले होते.

यावेळी सोनल जोशी यांनी मार्गदर्शन केले. या नंतर रक्तदान शिबीर घेण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन रोटरॅक्ट क्लब ऑफ विवेकानंद कॉलेज, रोटरॅक्ट क्लब ऑफ कोल्हापूर, रोटरॅक्ट क्लब ऑफ स्वराज्य, रोटरॅक्ट क्लब कोल्हापूर मिडटाउन फिनिक्स, रोटरॅक्ट क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल, रोटरॅक्ट क्लब ऑफ समर्पण यांनी एकत्रित केले. यावेळी कोल्हापूर झोन प्रमुख अभिजित पाटील, अध्यक्ष रोहित पाटील, श्रेयस पाटील, सूरज पाटील, वैष्णवी राजपूत, ऋग्वेद बिदनूर, अखिलेश जाधव, शंभूराज भोसले, शुभम वाडकर, सौरभ पाटील, अनिश भोसले उपस्थित होते.

सकाळ
कोल्हापूर, सोमवार, १८ मार्च, २०२४

# डॉ. दीपक तुपे यांच्या संशोधन प्रकल्पासाठी अनुदान मंजूर

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील हिंदी विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. दीपक रामा तुपे यांना नवी दिल्लीतील भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषदेने 'अहिंदी भाषी क्षेत्र में हिंदी भाषा का विकासः समस्या एवं समाधान' विषयाच्या संशोधन प्रकल्पासाठी पाच लाख रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे. याबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांनी डॉ. तुपे यांना सन्मानित केले. डॉ. तुपे यांना १५ वर्षे अध्यापनाचा, तर १२ वर्षे संशोधनाचा अनुभव आहे. त्यांनी आजपर्यंत १५५ राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये शोध निबंधांचे वाचन केले आहे. त्यांचे ६३ संशोधन आलेख राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पत्रिकेत प्रकाशित झाले आहेत. यापूर्वी त्यांनी 'वर्तमान संदर्भ में हिंदी भाषा का रोजगारोन्मुख पक्ष' या विषयावर लघु शोध प्रकल्प पूर्ण केला आहे. त्यांचे हिंदी भाषा और सूचना प्रौद्योगिकी विषयावर पुस्तक प्रकाशित झाले आहे. त्यांना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्या शुभांगी गावडे, कौतुभ गावडे, डॉ. श्रुती जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

18/03/24

18/3/24

तरुण भारत संवाद

रविवार, ३ मार्च २०२४

# नेहा भस्मेचा आज आरंगेत्रमद्वारे पहिला कलाविष्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

येथील प्रकाश नृत्यकला मंदिरच्या गुरू मोहिनी दिवाण यांची शिष्या नेहा संजय भस्मे रविवारी (दि. ३) 'आरंगेत्रम' कलाविष्कारातून रंगमचावर पहिले पदार्पण करणार आहे. भरतनाट्यमचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पहिला कलाविष्कार सादर करताना गुरूंना वंदन करण्यासाठी 'आरंगेत्रम'चे आयोजन केले जाते. संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहात रविवारी सायंकाळी साडेपाच वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

नेहाने श्रीमंत माईसाहेब बावडेकर विद्यालयातून शालेय शिक्षण तर विवेकानंद महाविद्यालयातून बी.कॉमचे पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. वयाच्या सहाव्या वर्षापासून देवयानी धर्माधिकारी यांच्याकडे भरतनाट्यमचे प्रशिक्षण घेण्यास



सुरूवात केली. २०१२ पासून गुरू मोहिनी दिवाण यांच्याकडे नृत्य शिकण्यास सुरूवात केली. २०१८ मध्ये तिने भरतनाट्यम विशारद पूर्ण केले.

या कार्यक्रमाला अभिनेत्री मधुरा वेलणकर-साटम उपस्थित राहणार आहेत. नेहाच्या 'आरंगेत्रम'ला उपस्थित राहण्याचे आवाहन सुप्रिया भस्मे यांनी केले आहे.

तरुण भारत संवाद
शनिवार, ३० मार्च २०२४



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये बोलताना आप्पासाहेब खोत. सोबत संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार.

# मातीशी नाळ जोडून आपली संस्कृती जपली पाहिजे

## कथाकथनकार आप्पासाहेब खोत यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

वाचनाने माणूस समृध्द होतो. महामानवांची चरित्रे वाचून विद्यार्थ्यांनी चारित्र्यवान बनले पाहिजे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने सामान्य माणसापासून लिहित्या हातांना बळ दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मातीशी नाळ जोडून आपली संस्कृती जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन कथाकथनकार आप्पासाहेब खोत यांनी केले.

विवेकानंद कॉलेजच्या गुणी विद्यार्थी गौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. विवेकानंद कॉलेजचे परीक्षा नियंत्रक डॉ. जी. जे. नवाथे, डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. एस. एस. कुंडले यांनी विविध पारितोषिकांचे वाचन केले. प्रा. सुप्रिया पाटील व प्रा. समीक्षा फराकटे यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. सहिदा कच्छी यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव आर. बी. जोग, डॉ. श्रुती जोशी, प्रा. संजय थोरात, प्रा. एन. आर. सणगर, डॉ. आरिफ महात, कॅप्टन सुनिता भोसले, लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा, प्रा. समीर पठाण उपस्थित होते.